# म. रा. वनरक्षक व पदोन्नत वनपाल संघटना
## म. रा. वनमजुर, वन कर्मचारी व वनक्षेत्रिय कर्मचारी संघटना

झाडे लावा, झाडे जगवा

ए-३/४, फॉरेस्ट सोसायटी, सेंटर पॉईंट शाळेच्या मागे, सेमीनरी हिल्स, नागपुर-४४००१३
मो. : 9860660066 | ईमेल : forestdeptunion@gmail.com

जगा आणि जगू द्या

श्री. अजय पाटील
केंद्रीय अध्यक्ष

श्री. माधव मानमोडे
कार्याध्यक्ष

क्रमांक: ११५ /२०२३-२४ दिनांक : १२/०९/२०२३

प्रति,

मा. मुख्यवनसंरक्षक (प्रादे.)
अमरावती वनवृत्त , अमरावती

विषय :- दि.३० जुन रोजी सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी / कर्मचाऱ्यांना दि.०१ जुलै रोजीची काल्पनिक ( Notional) वेतनवाढ मंजुर करण्याबाबत-

संदर्भ:- शासन परिपत्रक वित्त विभाग क्र.वेतन-२०२३/प्र.क्र.१३/सेवा-३ दि.२८.०६.२०२३

महोदय,

जे शासकिय अधिकारी/ कर्मचारी दि.३० रोजी सेवानिवृत्त झाले आहेत व ज्यांनी मागील १२ महिन्यांची अहर्तकारी सेवा केलेली आहे.अशा सर्व सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचाऱ्यांना दि.०१ जुलै रोजीची काल्पनिक ( Notional) वेतनवाढ मंजुर करणे व सुधारित सेवानिवृत्ती विषयक लाभ अनुज्ञेय करावेत याबाबत विहित कार्यपध्दती शासन परिपत्रक वित्त विभाग क्र.वेतन-२०२३/प्र.क्र.१३/सेवा-३ दि.२८.०६.२०२३ मध्ये सुचित करण्यात आलेली असतांना वनविभागातील आस्थापना विषयक शाखेने त्यानुसार कार्यवाही केलेली नसल्याचे सेवानिवृत्तांच्या तक्रारी संघटनेस प्राप्त होत आहे. तसेच सबंधित आस्थापना कक्षा कडुन कार्यालयात विचारणा करण्यास गेलेल्या सेवानिवृत्तांना सन्मानपुर्वक वागणुक सुध्दा मिळत नाही. दि.३० जुन रोजी सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी / कर्मचाऱ्यांना दि.०१ जुलै रोजीची काल्पनिक ( Notional) वेतनवाढ मंजुर करणे व सुधारित सेवानिवृत्ती विषयक लाभ अनुज्ञेय करणेबाबत मा.उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपिठातील दाखल याचिका क्रमांक १८८१/२०२३ व इतर याचिकांमध्ये दि.१६.०२.२०२३ चे खालील प्रमाणे आदेशानुसार कार्यवाही विहित कार्यपध्दती व कालमर्यादेत न केल्यास तो न्यायालयाचा अवमानना ठरतो. याची जाणीव विभागीय कार्यालय प्रमुख / आस्थापना कक्षास करुन द्यावी. हि विनंती.

मा.उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपिठातील दाखल याचिका क्रमांक १८८१/२०२३ व इतर याचिकांमध्ये न्यायालयाचे दि.१६.०२.२०२३ चे आदेश-

**"We, therefore, find it appropriate to order as under :-**

**[a] We direct the Chief Secretary of the State of Maharashtra and Principal Secretary (Finance Department), State of Maharashtra, to issue appropriate directions to all the concerned departments to appeal to such candidates, who fall in such category having retired on 30th June of the particular years and who have earned the annual increment on account of performing work for 12 months ending on 30th June, to tender their applications to the concerned Authorities.**

**[b] After such applications are received, the concerned authorities would grant the reliefs**

**as are being granted by the various High Courts by restricting the arrears of payments to 3 years preceding the dates of the applications or preceding the date of actual retirement as per actuals, whichever is less. With these guidelines, the concerned authorities shall not reject a single application if it fits into the parameters of the judgments delivered by this Court.**

**[c] In the alternative, let the concerned authorities suo-moto dig out such cases and after scrutinizing the same as regards their entitlment, proceed to grant the benefits as per the judgments of this court, within 120 days.**

**[d] While undertaking the above exercise, the gratuity/pay fixation/ pension will be re-calculated, so as to be paid to the candidates with arrears as directed above."**

**मा.उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपिठाने दिलेल्या आदेशात नमुद केल्या नुसार सबंधितांना सुधारीत सेवानिवृत्तीविषयक लाभ थकबाकीसह अनुज्ञेय करावेत.मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वांची पुर्तता करीत असलेल्या कोणत्याही सेवानिवृत्तांचा अर्ज फेटाळण्यात येऊ नये.याप्रमाणे निर्देश असुन मा.उच्च न्यायालयाने त्यांच्या दि.१६.०२.२०२३ रोजीच्या आदेशातील परिच्छेद क्रमांक ९ मध्ये नमुद केले आहे कि,This notional inclusion of the annual increment would be considered for re-calculating their pension, gratuity, earned leave, commutation of pension benefits etc तरी याप्रमाणे दि.३० जुन रोजी सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी / कर्मचाऱ्यांना त्यांचे हक्काचे लाभ त्वरित अनुज्ञेय करण्यात यावे. याकरिता विभागीय कार्यालयात येणाऱ्या सेवानिवृत्तांना सन्मानजनक वागणुक देण्याबाबत आस्थापना कक्षास योग्य सुचना देण्यात याव्यात.हि विनंती.**

**आपल्या योग्य सहकार्याचे अपेक्षेत-**

**आपला विश्वासु**

**(माधव मानमोडे)**
**केंद्रीय कार्याध्यक्ष**

**प्रतिलिपी,**

**मा.अजयभाऊ पाटील ,केंद्रिय अध्यक्ष महाराष्ट्र राज्य वनरक्षक व पदोन्नत वनपाल संघटना ,नागपुर तसेच केंद्रिय व वृत्तीय पदाधिकारी अमरावती वनवृत्त यांना माहितीस सादर**